स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचे वैद्यानिक महामंडळ)

**३२ वा मजला, सेंटर -१ बिल्डींग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

दुरध्वनी : (०२२) २२१५१८४७/१६७० फॅक्स : २२१५१६७ ई-मेल : info.mahasecurity@maharashtra.gov.in / dirrecruitment.mahasec@gmail.com


**जा.क्र.मरासुम/भरती/२१४०/२०२३** **दिनांक : २३/०८/२०२३**

## -: कार्यालयीन आदेश :-

### सुरक्षा रक्षक (कंत्राटी) निकष पडताळणी २०२३-२४
### उमेदवारांसाठी सुचना

२. उमेदवारांची दिनांक निहाय यादी महामंडळाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

३. उमेदवारांनी दिनांक निहाय यादीप्रमाणे सकाळी १०.०० वा. महामंडळाचे निकष पडताळणीसाठी आझाद मैदान पोलीस क्लब पहिला मजला हॉल, आझाद मैदान पोलीस ठाणे जवळ, मुंबई येथे हजर रहावे. (दुपारी ०३.०० वा. नंतर उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.)

४. निकष पडताळणीसाठी उमेदवारांना स्वखर्चाने हजर रहावे लागेल. निकष पडताळणी केंद्रावरती उमेदवारांसाठी कोणतीही व्यवस्था महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून केली जाणार नाही.

५. उमेदवारांनी आपल्या नातेवाईकांना निकष पडताळणी केंद्रावर आणू नये. फक्त उमेदवारांनाच निकष पडताळणीसाठी प्रवेश देण्यात येईल.

६. दिलेल्या दिनांकास उमेदवार निकष पडताणीस गैरहजर राहिल्यास त्यांना पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही. व त्यांचा पुन्हा निकष पडताळणी २०२३-२४ करीता विचार केला जाणार नाही.

७. उमेदवारांनी निवासाची व्यवस्था स्वत: करावी. निकष पडताळणीसाठी दिलेल्या दिनांक व वेळेस हजर रहावे. त्यापुर्वी कोणीही भरतीसाठी दिलेल्या केंद्राच्या ठिकाणी येऊ नये. सदर ठिकाणी वेळेच्या आधी आल्यास तेथे प्रवेश दिला जाणार नाही. तसेच ज्या उमेदवारांना मोबाईलवर संदेश प्राप्त झालेला आहे. किंवा वेबसाईटवर प्रसिध्द यादीत ज्यांचे नावे आहे, त्यांनीच सदर ठिकाणी हजर राहवे व इतरांना प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

८. उमेदवारांनी आपली कागदपत्रे / साहित्याची योग्यरित्या काळजी घ्यावी.

९. उमेदवारांनी १२ वी पास गुणपत्रिका व प्रमाणपत्र, / जन्म दाखला / शाळा सोडण्याचा दाखला / शालांत परिक्षा प्रमाणपत्र / आधार कार्ड / पॅन कार्ड / अधिवास प्रमाणपत्रांच्या मुळ प्रतिसह छायांकित प्रती सोबत आणाव्यात तसेच २ रंगीत फोटो आणावेत. तसेच सोबत पोलीस भरती मध्ये मैदानी व लेखी परिक्षेस हजर राहील्याबाबतची कागदपत्राची छायांकित प्रती सोबत आणाव्यात.

१०. जे उमेदवार यापुर्वी महाराष्ट्र सुरक्षा बलात कार्यरत आहेत / किंवा कार्यरत होते. व त्यांची सेवा कसुरीमुळे समाप्त करण्यात आली आहे. किंवा करार खंडीत करण्यात आला आहे. किंवा या पुर्वी भरती होऊन प्रशिक्षण पुर्ण केलेले असून प्रतिक्षाधीन यादीवर आहेत. असे उमेदवार सन- २०२१ च्या पोलीस भरतीस हजर राहलेले आहेत. त्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर संदेश मिळाला किंवा वेबसाईटवर प्रसिध्द यादीत त्यांचे नावे असले तरी त्यांनी भरती नोंदणीसाठी हजर राहु नये. हजर राहील्यास त्यांना अपात्र ठरवण्यात येईल. तसेच दिशा भुल करुन महामंडळात पुन्हा नेमणुक मिळवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही /-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.